# प्रेसनोट

जा.क्र. ३८९/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २६/ ०७/२०१८

## '' आर्थिक अफरातफर करण्याऱ्या आरोपींतास सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे साकोली अंर्तगत भिवसनटोला येथिल १) ईसम गणेश उदेलाल खंडाते, वय ४५ वर्ष, २) सौ. नलीनी गिरीधारी टेंभुर्णे वय २६ वर्ष दोन्ही रा. भिवसन टोला यांनी पदाचा दुरूपयोग करून जल स्वराज्य पाणी पुरवठा व स्वच्छता समीती येथील पाण्याची टाकी, विहीर खोदकाम नळ योजनेचे मंजुर झालेल्या पैश्याची आर्थिक अफरातफर केल्याचे आरोप सिध्द झाल्याने दिनांक २५.०७.२०१८ रोजी प्रथम श्रेणी न्यायदंडाधीकारी श्री. एन. के. वारके, साहेब साकोली यांनी आरोपीस सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १८.१२.२००९ रोजी तक्रारदार रविंद्र नत्थुजी गभणे, वय ६१ वर्ष, रा. शास्त्री नगर भंडारा यांचे तक्रारीवरून गणेश खंडाते हा भिवसन टोला पांडा समीतीचे सचिव म्हणुन काम करीत होता व अध्यक्ष पदावर म्हणुन सौ. नलीनी टेंभुर्णे हया कार्यरत असतांना त्यांनी जलस्वराज्य पाणी पुरवठा व स्वच्छता समीती कडुन भिवसनटोला येथील पाण्याची टाकी, विहीर खोदकाम व नळ योजनेचे मंजुर झालेल्या ३,७१,०४१ रूपया पैकी १,८४,३७७ रूपयाचे काम केले परतु बॅकेत जमा असलेल्या पैश्या मध्ये ११,४४५ रूपये फक्त शिल्लक ठेवुन १,७५,४२४ रूपयाची पदाचा दुरूपयोग करून आर्थिक अफरातफर केल्याबाबत फिर्यादीचे तक्रारीवरून आरोपीतांन विरूध्द पो.स्टे. साकोली येथे अप.क्र. २३५/२००८ कलम ४०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोलीस उपनिरीक्षक व्ही.एस.शेंडे यांनी केला असुन पुढील तपास पोउपनि एस.एस. मेघरे यांनी सुरू करून गुन्हयातील आरोपी **१) गणेश उदेलाल खंडाते, वय ४५ वर्ष, भिवसनटोला. २) सौ. नलीनी गिरीधारी टेंभुर्णे, वय २६ वर्ष, रा. भिवसन टोला** यांना तात्काळ अटक केले व साक्षपुरावा गोळा केला. आरोपींतान विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने दोषारोप पत्र मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधीकारी साहेब साकोली

येथे दाखल केले. सदर आरोपपत्रा केस क्र. ६/२०१० अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **प्रथम श्रेणी न्यायदंडाधीकारी साहेब साकोली श्री. एन के. वारके,** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट एच. जी. नागदेवे, सहा. सरकारी अभियोक्ता**, साकोली यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. दिनांक २५.०७.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन पुराव्याचे आधारावर **कलम ४०६,३४ भादवी** अन्वये दोषसिध्द झाल्याने **आरोपी गणेश उदेलाल खंडाते,** यास सहा महीने सश्रम कारावास व ५,००० रूपये **दंड व सौ. नलीनी गिरीधारी टेंभुर्णे, वय २६ वर्ष रा. भिवसन टोला यांना ३ महिने सश्रम कारावास व २,००० रूपये दंडची शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, रामेश्वर पिपरेवार, ठाणेदार पोलीस ठाणे साकोली यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक, विनोद बघेल/२७, पो.शी. अंडेल/१२८७ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधीकारी
संपर्क क्र ०९४०३१०९७२०

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.